शासकीय योजना

सहारा आफ्रिकन देशातील गोदाम पावती संकल्पना

मंगेश तिटकारे, हेमंत जगताप

शेतकऱ्यांची शेती व्यवसायातील जोखीम कमी करण्यासाठी व शाश्वत उत्पन्नाचा मार्ग निर्माण करण्याच्या दृष्टीने गोदाम पावती हा एक उत्तम मार्ग असेल. याकरिता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गोदाम पावतीविषयक विविध वैधानिक तरतुदी व नियम माहिती असणे आवश्यक आहे.

शेती व्यवसायातील जोखीम कमी करण्यासाठी गोदाम पावती महत्त्वाची आहे.

कृषी क्षेत्रात समुदाय आधारित संस्था म्हणजेच सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी व महिला बचत गटांचे फेडरेशन यांनी विविध योजना आणि प्रकल्पांच्या माध्यमातून वेगवेगळ्या पिकांच्या मूल्यसाखळ्यांमध्ये सहभागी होताना प्राधान्याने गोदाम व प्राथमिक प्रक्रिया केंद्र यांची उभारणी केली आहे. परंतु या पायाभूत सुविधांची उभारणी केल्यानंतर व्यवसाय उभारणीच्या दृष्टीने अवलंब करण्यात येणाऱ्या विविध पर्यायांपैकी गोदाम पावती व्यवसाय भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. शेतकऱ्यांची शेती व्यवसायातील जोखीम कमी करण्यासाठी व शाश्वत उत्पन्नाचा मार्ग निर्माण करण्याच्यादृष्टीने गोदाम पावती हा एक उत्तम मार्ग असेल. याकरिता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गोदाम पावतीविषयक विविध वैधानिक तरतुदी व नियम माहिती असणे आवश्यक आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्या माध्यमातून गोदाम पावती योजना राबविण्यात येते. गोदाम पावत्यांच्या विविध प्रकारांमध्ये निगोशिएबल व नॉन-निगोशिएबल असे दोन प्रकार आहेत. विविध देशांमध्ये गोदाम पावतीचे स्वरूप, नियम व अंमलबजावणी प्रक्रिया वेगवेगळ्या स्वरूपात असू शकतात.

विकसनशील देशातील शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी वित्तपुरवठा मिळविण्यात मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या शेतीतील निर्णयक्षमतेवर होऊ शकतो. उदाहरणार्थ, जरी शेतकऱ्यांना माहिती असले, की काढणीनंतर लगेच शेतीमालाची विक्री करू नये, अशावेळेस शेतमालाच्या किमती सामान्यतः कमी असतात, तरीही त्यांना त्यांच्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी रोख रकमेची आवश्यकता असते, म्हणून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे त्यांना शेतीमाल विक्री करण्यास भाग पाडले जाते. या आव्हानांना कृषी मूल्य साखळीतील विविध घटकांमार्फत तयार केलेल्या वित्तसाह्य पुरवठ्याच्या विविध उपायांना तोंड द्यावे लागते. कृषिमूल्य साखळीच्या शेतीमालाच्या काढणीनंतरच्या भागाला गोदाम पावती वित्तपुरवठा शेतकऱ्यांना अधिक कार्यक्षमतेने कार्य करण्यास सक्षम करतो. तसेच शेतकऱ्यांना निधी उपलब्ध करून देण्यास मदत करण्यासाठी हे एक अत्यंत महत्त्वाचे उपयुक्त साधन आहे. जर शेतकऱ्यांना गोदाम पावती वित्तपुरवठा वेळेत व तात्काळ उपलब्ध होत असेल, तर त्यामुळे शेतकऱ्यांना स्वतःचा शेतीमाल गरजेनुसार विकण्याची संधी मिळू शकते. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या वैयक्तिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांचे उत्पादन तात्काळ विकण्याऐवजी, शेतकरी ते साठवू शकतात आणि कर्जासाठी तारण म्हणून गहाण ठेवू शकतात. तसेच जेव्हा शेतमालाच्या किमती वाढतील, तेव्हा शेतकरी शेतीमाल विक्री करण्याचे नियोजन करू शकतात.

वित्तपुरवठादार संस्थांच्या म्हणजेच बँका, पतसंस्था, बिगर-वित्तीय संस्था, सूक्ष्मवित्तपुरवठादार कंपन्या यांच्या दृष्टिकोनातून, गोदाम पावत्या, जेव्हा तारण म्हणून वापरल्या जातात, तेव्हा शेतकऱ्यांना तारण कर्ज मिळण्यास त्यांची मदत होऊ शकते. गोदाम पावती वित्तपुरवठ्यामुळे प्रक्रिया उद्योगांना वर्षभर त्यांचा प्रक्रिया करण्यास आवश्यक असलेल्या धान्याच्या साठ्यासाठी निधी उपलब्ध होऊ शकतो. निर्यातदारांना देखील त्यांच्या शेतीमालाच्या अपेक्षित विक्रीच्या वेळेस गोदाम पावती कर्जामुळे फायदा होतो. याव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय बँका ग्राहकांना स्थानिक बँकापेक्षा कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्याची संधी निर्माण करून देतात.

वित्तपुरवठ्याचे तंत्र

- गोदाम पावती वित्तपुरवठा हे एक प्राचीन वित्तपुरवठ्याचे तंत्र असून हे मेसोपोटेमिया देशातील दगडांवर कोरीव पद्धतीने लेखाच्या स्वरूपात कोरलेले आढळते. अमेरिका आणि युरोपमध्ये शेती आणि शेतमाल प्रक्रियेच्या वित्तपुरवठ्यात गोदाम पावती महत्त्वाची भूमिका बजावते. विकसनशील देशांमध्ये गोदाम पावतीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. परंतु या देशांमध्ये गोदाम पावतीचा वापर मुख्यतः आयात आणि निर्यातीतील शेतमालाच्या वित्तपुरवठ्यासाठी केला जातो. अलीकडच्या वर्षात, राष्ट्रीय अन्न मूल्य साखळीमध्ये गोदाम पावतीचा वापर वाढविण्यासाठी विविध देशाच्या सरकारांनी अनेक खाजगी भागीदारांच्या मदतीने बरेच प्रयत्न केले आहेत.
- २०१३ च्या अखेरीस, एजन्सी फॉर फ्रँकाइज डी डेव्हलपमेंट (AFD), टेक्निकल सेंटर फॉर ॲग्रिकल्चरल अँड रुरल कोऑपरेशन (CTA) आणि इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट (IFAD) यांनी आफ्रिकेतील वेअरहाउस रिसिप्ट फायनान्स किंवा गोदाम पावती पुरवठ्याच्या व्याप्तीचा आढावा घेण्यासाठी आणि त्याच्या विस्तारासाठी धोरणे आणि रणनीती तयार करण्यास मदत करण्याच्या उद्देशाने त्याच्या अभ्यासासाठी निविदा प्रदर्शित केली होती. कृषी जोखीम व्यवस्थापन प्लॅटफॉर्म (PARM), युरोपियन कमिशन (UC), इटालियन डेव्हलपमेंट को-ऑपरेशन (IDC), IFAD आणि AFD यांच्याद्वारे प्राप्त निधीच्या साह्याने गोदाम पावती या विषयावर अभ्यास करण्यासाठी इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंटद्वारे आयोजन करण्यात आले. या अभ्यासासाठी त्यांच्या मार्फत निधीदेखील देण्यात आला होता.

गोदाम पावती वित्तपुरवठ्याचे प्रकार

एका विद्याशाखीय पथकाने बुर्किना फासो, कॅमेरून, कोट डी' आयव्होअर, घाना, मादागास्कर, मोझांबिक, नायजर, सेनेगल आणि युगांडा या नऊ आफ्रिकन देशांमध्ये क्षेत्रीय स्तरावर सर्व्हे करून स्थानिक परिस्थितींची तपासणी केली. तसेच विविध प्रकारच्या गोदाम पावती वित्तपुरवठ्याच्या व्यापक वापरातील अडथळे ओळखून प्रत्यक्ष कृतीसाठी अथवा अंमलबजावणीसाठी प्रस्ताव तयार केला. या पथकात नऊ देशांमधील कायदे, बँकिंग आणि गोदाम व्यवस्थापन पार्श्वभूमी असणारे आंतरराष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील तज्ज्ञांसह विविध व्यावसायिकांचा देखील समावेश होता. गोदाम पावती वित्तपुरवठ्याचे सामान्यतः चार प्रकार असतात.

लहान शेतकऱ्यांसाठी सामुदायिक साठवणूक वित्तपुरवठा (इन्व्हेंटरी क्रेडिट)

- अनेक मायक्रोफायनान्स कंपन्या (MFI) या अनेक व्यावसायिक बँकांकडून अर्थसाह्य घेऊन गोदाम पावतीसाठी पुनर्वित्तसाह्य करतात. या पद्धतीत धान्य साठा शक्यतो सामुदायिक स्टोअर्स किंवा घरगुती इमारतीमध्ये दुहेरी-पॅडलॉक व्यवस्थेखाली ठेवला जातो. या पद्धतीत सामुदायिक स्टोअर्स किंवा घरगुती इमारतींच्या एका कुलपाच्या चाव्या उत्पादक संघटना (PO) किंवा शेतकऱ्यांच्या गटाकडे असतात आणि दुसऱ्या कुलपाच्या चाव्या मायक्रोफायनान्स कंपन्या (MFI) म्हणजेच वित्तपुरवठादाराकडे असतात.

खासगी गोदामे

- या प्रकारात शेतीमाल तारण व्यवस्थापकाच्या (CM) नियंत्रण आणि जबाबदारीखाली असलेल्या खासगी गोदामात साठविलेल्या वस्तूंसाठी वित्तपुरवठा केला जातो. त्याचप्रमाणे या पद्धतीत क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध असणाऱ्या गोदामांचा सुद्धा समावेश असू शकतो, ज्यामध्ये शेतमाल कर्जदाराच्या गोदामामध्ये ठेवला जातो. तसेच ही गोदामे अनेक वेळा तात्पुरत्या स्वरूपात शेतीमाल तारण व्यवस्थापकामार्फत (CM) भाड्याने घेतली जातात किंवा वित्तपुरवठादार संस्था ही गोदामे त्यांना भाड्याने देऊन त्यांच्या व्यवस्थापनाखाली सुरक्षितपणे वित्तपुरवठा करतात.

सार्वजनिक गोदामे

- या प्रकारात सार्वजनिक गोदामात साठविलेल्या वस्तूंसाठी वित्तपुरवठा केला जातो. हे गोदाम सामान्य जनतेसाठी खुले असते. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ हे सार्वजनिक गोदाम व्यवस्थेचे उदाहरण आहे. परंतु याचा अर्थ असा नाही, की हे गोदाम राज्यशासनाचे असते; बहुतेक वेळा सार्वजनिक गोदामे शासकीय अथवा खाजगी मालकीची देखील असतात.

चालू किंवा भविष्यातील उत्पादनाच्या सुरक्षिततेवर कर्ज देणे

- या प्रकारात, निधी देणाऱ्या संस्था कागदोपत्री सुरक्षिततेवर कर्ज देतात, जे वर्तमान किंवा भविष्यातील अंदाजित उत्पादनावर आधारित असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ब्राझीलमध्ये लोकप्रिय झालेले ग्रामीण (कृषी रोखे) ज्याला सेडुलास डी प्रोड्युटोस असे म्हणतात.

हे सर्व वित्तपुरवठ्याचे प्रकार विशिष्ट उद्देशांसाठी चांगल्या प्रकारे तयार केलेले आहेत. अनेक प्रकारे, ते एकमेकांना पूरक आहेत. बँकांनी गोदाम पावती प्रणालीच्या वापरामुळे नियामक वातावरणात निर्माण झालेल्या संधींचा वापर करून वित्तपुरवठा करावा. शेतकरी आणि शेतीतील इतर भागधारकांनी नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणा वापरण्यासाठी अधिक चांगल्या प्रकारे सहकार्य करावे व स्वतः तयार होऊन इतरांना सुद्धा सहभागी होण्यास प्रवृत्त करावे. त्याचप्रमाणे विकसित भागीदारांनी त्यांच्यामार्फत आयोजित कृषी विकास कार्यक्रमांमध्ये गोदाम पावती वित्तपुरवठ्याला योग्य स्थान द्यावे व त्याचा प्रसार करावा. आफ्रिकेत गोदाम पावती वित्तपुरवठा व्यवहार्य असून त्याची ताकद अनेक कृषी कर्जदारांनी आधीच ओळखलेली आहे. या दृष्टिकोनाचा विस्तार करण्यासाठी आणि कृषी उत्पादकांसाठी व शेतकरी कंपन्यांसाठी या चाचणी केलेल्या वित्तपुरवठा साधनाची उपलब्धता लोकांपर्यंत पोहोचेल अशी परिस्थिती निर्माण करण्याची आता वेळ आली आहे.

- प्रशांत चासकर ☏ ९९७०३६४१३०
(शेतीमाल तारण व्यवस्थापन सेवा तज्ज्ञ, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या. साखर संकुल, पुणे)